महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

मंगळवार ■ ११ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १३६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# दिल्ली स्फोटाने हादरली

## मुंबईत हाय अलर्ट : राज्यातील पोलिस यंत्रणा सतर्क

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**दिल्ली** : दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळ झालेल्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर अलर्ट जारी करण्यात आला आहे. शहरातील सर्व महत्त्वाच्या आणि गर्दीच्या ठिकाणी सुरक्षा वाढवली आहे. पुणे रेल्वे स्टेशन, बसस्थानक, विमानतळ, मॉल्स, धार्मिक स्थळे आणि प्रमुख चौकांवर अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहरातील ठिकठिकाणी नाकाबंदी करून वाहनांची तपासणी सुरू आहे. पुणे पोलिसांकडून नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तत्काळ पोलिसांना कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हरियाणातील फरीदाबाद येथून सुमारे ३६० किलो संभाव्य अमोनियम नायट्रेट जप्त करण्यात आल्यानंतर आज दुपारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'वर्षा' निवासस्थानी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत राज्यातील एकूण सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. दरम्यान, दिल्लीतील स्फोटाच्या घटनेनंतर मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा पोलिसांना सतर्क राहण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत. राज्यातील सर्व सुरक्षा आणि तपास यंत्रणांना हाय अलर्टवर राहण्याचे आदेश देण्यात आले असल्याची माहिती गृह विभागातील सूत्रांनी दिली आहे.

दिल्लीतील स्फोटानंतर महाराष्ट्रात सुरक्षा यंत्रणांनी संवेदनशील स्थळी गस्त आणि तपासणी वाढवली असून नागपूर ते मुंबईपर्यंतच्या संघटनात्मक आणि सार्वजनिक ठिकाणांवरही विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. पुणे आणि कोल्हापूरमध्ये महत्त्वाच्या सार्वजनिक ठिकाणी पोलिस बंदोबस्त कडक केला गेला आहे, नाका तपासणी आणि रस्ते गस्त वाढवण्यात आल्या असून सर्व सुरक्षा एजन्सी घटनास्थळी मिळून घटनेचा सखोल अभ्यास व त्वरित तपास करत आहेत. नागरिकांनी संयम राखण्याचे आणि कोणतीही संशयास्पद बाब आढळल्यास तत्काळ स्थानिक पोलिसांना कळवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



**हरियाणातील फरीदाबाद येथून सुमारे ३६० किलो संभाव्य अमोनियम नायट्रेट जप्त**



**स्फोट झाला ते ठिकाण लाल किल्ल्यापासून अवघ्या ८०० मीटर अंतरावर**

**दिल्लीत ज्या ठिकाणी हा स्फोट झाला ते ठिकाण लाल किल्ल्यापासून फक्त ८०० मीटर अंतरावर आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी हा संपूर्ण परिसर रिकामा केला. या ठिकाणी अग्नीशमन दल पोहोचलं असून लागलेली आग आटोक्यात आणण्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. तसेच या ठिकाणी एनएसजीचे वरिष्ठ अधिकारीही दाखल झाले आहेत. त्याचसोबत फॉरेन्सिक टीमही या ठिकाणी दाखल झाली असून ते पुरावे गोळा करण्याचं काम करत आहेत.**

## लक्षवेधी



## ठाण्यातून मूर्तीसह मंदिर गायब ?

### ग्रामस्थांची भाजपकडे धाव

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाण्यातील ढोकाळी परिसरात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हायलँड पार्क रोडवरील सुमारे ५० वर्षे जुने कुलदैवताचे मंदिर अचानक मूर्तीसह गायब झाल्याने स्थानिक ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मंदिरच नाहीसे होण्याबरोबरच मंदिरातील चांदीचे पूजासामान, तसेच परिसरातील जुनी विहीरही बुजवण्यात आल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या प्रकरणी पोलिस तक्रार दाखल करून घेण्यास नकार देत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, त्यांनी याप्रकरणी आमदार संजय केळकर यांची भेट घेतली.

ठाण्यातील ढोकाळी परिसरात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हायलँड पार्क रोडवर सुमारे ५० वर्षे जुने कुलदैवताचे मंदिर आहे. २० सप्टेंबर रोजी नवरात्रीनिमित्त मंदिराची स्वच्छता करण्यासाठी काही ग्रामस्थ मंदिरात गेले असता, त्यांना मंदिरच जागेवरून गायब झाल्याचे दिसून आले. मंदिराच्या ठिकाणी आता रिकामी जागा असून, परिसर सपाट करण्यात आल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले. मंदिरात असलेल्या दैवताच्या मूर्ती, चांदीचे साहित्य गायब झाल्याचे आढळून आले होते. विहीरही बुजवण्यात आली आहे.

**पोलिस नोंद घेत नाहीत?**

या प्रकरणी जवळच्या पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी तक्रार घेण्यास टाळाटाळ केली, असा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला. आमच्या देवाचं मंदिर ५० वर्षांपासून इथे होतं. आता मंदिरच गायब झालं, मूर्तीही नाहीत. पोलिसांकडे गेलो तरी ते फक्त तपास करतो म्हणतात, पण गुन्हा दाखल करत नाहीत, असे ग्रामस्थ म्हणाले.



## खा. नरेश म्हस्के यांनी केली ठाणे स्थानकाची पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे रेल्वे स्थानकातून प्रवास करणाऱ्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन फलाट क्रमांक २.३ आणि ४ वरची फलाटाची लांबी वाढविण्याची मागणी वारंवार होत होती. त्यानुसार, रेल्वे प्रशासनाकडून फलाट लांबीचे काम हाती घेण्यात आले होते. हे काम प्रगतीपथावर असून येत्या ३१ डिसेंबर पासून या तीनही फलाटांवर १५ डब्यांची लोकल थांबणार असल्याची ग्वाही खासदार नरेश म्हस्के यांनी दिली. या फलाटांची लांबी वाढविल्याने तीन अतिरिक्त डब्यांतून ठाणेकरांना सुखकारक आणि आनंददायी प्रवास करता येणार असल्याचेही खासदार म्हस्के यांनी सांगितले. खासदार नरेश म्हस्के यांनी सोमवरी रेल्वे स्थानकाचा पाहणी दौरा करत विविध विकासकामांचा आढावा घेतला.

फलाटांची लांबणी वाढविणे, फलाट क्रमांक ५ आणि ६ वर एक्सलेटर बसविण्याचे काम, पावसाळ्यात रेल्वे रुळावर पाणी साठू नये यासाठी मायक्रोटेकद्वारे भूमिगत वाहिन्या टाकल्या जात आहेत, अशी विविध विकास कामे सुरु असून त्याची पाहणी करण्यासाठी सोमवारी खासदार नरेश म्हस्के यांनी पाहणी दौरा केला. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन खासदार म्हस्के यांनी फलाट क्रमांक २, ३ आणि ४ ची लांबी वाढविण्याची मागणी रेल्वे प्रशासनाकडे केली होती. त्या कामाला मंजूरी मिळाली असून हे काम प्रगतीपथावर आहे. हे काम १५ डिसेंबरपर्यंत मार्गी लागणार असून ३१ डिसेंबरपासून या तिनही फलाटांवर १५ डब्यांची लोकल थांबणार आहे. लांबी वाढविल्याने ३ अतिरिक्त डब्यांतून ठाणेकरांना सुखकारक आणि आनंददायी प्रवास करता येणार असल्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी यावेळी सांगितले.

# ठाणे महापालिका निवडणुकीसाठी आज आरक्षण सोडत

### गडकरी रंगायतन येथे स. १०. ०० वाजल्यापासून होणार सोडत कार्यक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (११)** : ठाणे महानगरपालिकेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण महिला यांच्यासाठी आरक्षण निश्चित करण्याकरीता सोडत काढणे, तसेच आरक्षणाचे प्रारूप प्रसिध्द करण्यासाठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

ठाणे महापालिकेच्या राम गणेश गडकरी रंगायतन, मूस रोड, तलावपाळी, ठाणे (प.) या नाट्यगृहात मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर, २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजल्यापासून आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे.

**प्रवर्गांची रचना**

ठाणे महानगरपालिकेत एकूण ३३ प्रभाग आहेत. त्यापैकी, ३२ प्रभाग हे चार सदस्यीय असून ०१ प्रभाग तीन सदस्यीय आहे. या ३३ प्रभागातून एकूण १३१ सदस्य निवडले जाणार आहेत. या १३१ पैकी, अनुसूचित जातींसाठी ०९ जागा, अनुसूचित जमातींसाठी ०३ जागा, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३५ जागा आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ८४ जागा आहेत.

एकूण १३१ जागांपैकी महिलांसाठी ६६ जागा आरक्षित आहेत. त्यापैकी, अनुसूचित जातींच्या ०५ जागा, अनुसूचित जमातींच्या ०२ जागा, नागरिकांचा मागास प्रवर्गातील १८ जागा आणि सर्वसाधारण प्रर्वगातील ४१ जागा महिलांसाठी राखीव आहेत.

**हरकत व सूचनांचा कालावधी**

सोमवार, दि. १७ नोव्हेंबर, २०२५ रोजी आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्यात येणार आहे. तर, सोमवार, दि. १७ नोव्हेंबर, २०२५ ते सोमवार, दि. २४ नोव्हेंबर, २०२५ ( दुपारी ३.००वाजेपर्यंत ) आरक्षणाबाबत हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी आहे. नागरी सुविधा केंद्र अथवा सर्व संबंधित नऊ प्रभाग समिती कार्यालय येथे सादर कराव्यात, असे आवाहन ठाणे महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे. दाखल झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन आरक्षणाची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल. ऑनलाईन स्वरुपात व ठाणे महानगरपालिकेच्या इमेलवर पाठवण्यात आलेल्या हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार नाहीत, असेही निवडणूक विभागाने स्पष्ट केलेले आहे.

### ठाणे महापालिका एकूण जागा -१३१

| | |
|---|---|
| सर्वसाधारण खुला प्रवर्ग | - ४३ |
| सर्वसाधारण खुला प्रवर्ग (महिला) | - ४१ |
| नागरिकांचा मागास प्रवर्ग | - १७ |
| नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) | - १८ |
| अनुसुचित जाती | - ०४ |
| अनुसुचित जाती (महिला) | - ०५ |
| अनुसुचित जमाती | - ०१ |
| अनुसुचित जमाती (महिला) | - ०२ |



**सोडतीचा क्रम**

**नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि महिलांसाठी राखीव करावयाच्या सर्व प्रवर्गांतील जागांसाठी सोडतीच्या चिठ्ठ्या शालेय विद्यार्थ्यांकडून काढण्यात येतील. त्यात प्रथम अनुसूचित जातीच्या महिलांसाठी ०५ जागांची सोडत काढण्यात येईल. नंतर, अनुसूचित जमातीच्या ०२ प्रभागांच्या जागांसाठी सोडत काढली जाईल. त्यानंतर, नागरिकांच्या मागास प्रर्वगाच्या प्रभागांसाठी ३५ जागा आरक्षित करायच्या असून त्यासाठी सोडत निघेल. त्यानंतर, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील महिलांच्या १८ जागांसाठी आरक्षण सोडत होईल. पाठोपाठ सर्वसाधारण (खुल्या) प्रवर्गातील महिलांसाठी राखीव करावयच्या ४१ जागांसाठी आरक्षण सोडत होईल.,**



### भारतीय जनता पार्टीच्या प्रचारार्थ

## बदलापूरात कार्यकर्ता संवाद मेळावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : कुळगाव-बदलापूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २३ मधील भारतीय जनता पार्टीच्या प्रचारार्थ कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन पनवेलकर इस्टेट येथे करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन समाजसेवक श्री. संदेश (बाळा) राऊत व सौ. अश्विनी समीर धारवे यांच्या वतीने करण्यात आले होते.नागरिकांनी दाखवलेला उत्स्फूर्त सहभाग आणि विश्वास भारतीय जनता पार्टीच्या विचारधारेवरील जनतेच्या निष्ठेचे प्रतीक असून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घराघरात जाऊन विकासाचे विचार आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सक्षम प्रशासनाचे कार्य जनतेपर्यंत पोहोचवावे, असे आवाहन आमदार किसन कथोरे यांच्या वतीने या वेळी करण्यात आले. या कार्यक्रमास प्रभाग क्रमांक २३ मधील हजारो नागरिक उत्स्फूर्तपणे उपस्थित राहिले. नागरिकांचा जबरदस्त प्रतिसाद आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून आगामी निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला निश्चितच भक्कम यश मिळेल, असा विश्वास कथोरे यांनी या वेळी व्यक्त केला.

## भाजप आणि सेनेची युती होणार का?

### चर्चेला उधाण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर** : ठाणे जिल्ह्यातील बदलापूर आणि अंबरनाथ नगरपरिषद निवडणुका जाहीर होताच स्थानिक राजकारणात चांगलाच राजकीय तापमान वाढले आहे. भाजप आणि शिवसेनेमध्ये युती होणार का? या चर्चेला आता अधिकच उधाण आलं आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या दोन्ही नगरपरिषदांवर शिवसेनेची सत्ता असून, या वेळी मात्र भाजप आणि शिवसेना युतीबाबत अजूनही निर्णय झाले नाही. **भाजप-शिवसेनेची युतीवरून आरोप-प्रत्यारोप** - दोन्ही पक्षांचे स्थानिक नेते एकमेकांवर युती संदर्भात आरोप-प्रत्यारोपांची मालिका सुरू केली आहे. बदलापूर भाजपचे माजी नगराध्यक्ष राजेंद्र घोरपडे हे म्हणाले की, 'आम्ही युतीसाठी इच्छुक आहोत', मात्र शिंदे गटाचे शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी भाजप आमदारांना थेट ओपन चॅलेंज देत म्हटले आहे की, 'बदलापूरात आम्ही एकहाती सत्ता आणू शकतो.' भाजपकडून युतीचे संकेत दिले जात असताना शिंदे गटाकडूनही लवचीक भूमिका घेतली गेली तर, दोन्ही पक्षांमध्ये मनोमिलन होणार का? हा प्रश्न आता सर्वांच्या मनात निर्माण झाला आहे. यासंदर्भात बदलापूरचे शिवसेनेचे शहर प्रमुख व माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांनी स्थानिक भाजप आमदार किसन कथोरे यांच्यावर आरोप करत म्हणाले की, 'भाजपा आणि शिवसेना हे मित्र पक्ष बदलापूर नगरपालिकेत 2005 वगळता कधीही एकत्र निवडणूक लढवली नाही, त्यांच्याकडे तसेच शिवसेनेमध्येही भरपूर पदाधिकारी आहेत प्रत्येकाला निवडणूक लढवण्याची इच्छा आहे. इच्छा असताना तरीसुद्धा युतीच्या प्रस्ताव स्वतः मी माजी मंत्री कपिल पाटील यांच्याकडे ठेवला होता त्यानंतर कपिल पाटील यांनी मला बोलवून चर्चा केली.'





# राष्ट्रीय शिक्षण दिन

## देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझादांचे योगदान



भारतात दरवर्षी ११ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. देशाचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद ( Maulana Abul Kalam Azad ) यांचा ११ नोव्हेंबर हा जयंती दिन आहे. ११ नोव्हेंबर २००८ पासून हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाने घेतला होता.

मौलाना आझाद यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान बहुमोल आहे. यासाठी त्यांना १९९२ मध्ये सर्वोच्च भारतीय नागरी सन्मान असलेल्या 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.मौलाना आझाद यांच्याविषयी जाणून घेऊ -

- मौलाना अबुल कलाम आझाद यांचा जन्म ११ नोव्हेंबर १८८८ रोजी झाला होता. त्यांचे वडील मोहम्मद खैरुद्दीन हे एक मुस्लिम विद्वान होते.
- मौलाना आझाद यांचे पूर्ण नाव - मौलाना सैयद अबुल कलाम गुलाम मुहियुद्दीन अहमद बिन खैरुद्दीन अल-हुसैन असे होते.
- स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना आझाद यांनी राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार केले. मोफत प्राथमिक शिक्षण हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते.
- मौलाना आझाद यांना आझाद या नावाने ओळखले जात होते. त्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात देखील सहभाग घेतला होता. ते काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांपैकी एक होते.
- स्वातंत्र्योत्तर भारतात झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये आझाद उत्तर प्रदेशातील रामपूर जिल्ह्यातून खासदार म्हणून निवडून गेले आणि भारताचे पहिले शिक्षणमंत्री बनले.
- इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) आणि विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) च्या स्थापनेचं श्रेय मौलाना आझाद यांनाच दिलं जातं.
- त्यांनी शिक्षण आणि सांस्कृतिक विकासासाठी संगीत नाटक अकादमी (१९५३), साहित्य अकादमी (१९५४) आणि ललितकला अकादमी (१९५४) सारख्या संस्थांची देखील स्थापना केली.

एक स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी आणि पत्रकार मौलाना आझाद हे ब्रिटीश राजवटीविरुद्ध भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सर्वात प्रमुख राष्ट्रीय नेते म्हणून उदयास आले. त्यांनी ब्रिटीश सरकारच्या सेमेटिझमचा निषेध केला. तसेच, ते जातीय राजकारणाच्या विरोधात होते आणि सर्व धार्मिक समुदायांच्या सहअस्तित्वावर त्यांचा दृढ विश्वास होता.

# काळ्या काचांच्या गाड्यांवर रायगड पोलिसांची धडक मोहीम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : काळ्या काचांमुळे होणारे अनेक प्रकारचे गुन्हे रोखण्यासाठी रायगड पोलिसांनी सर्व तालुक्यांतील गाड्यांच्या काचांना लावण्यात आलेल्या काळया रंगाच्या फिल्म काढण्याची व दंडात्मक कारवाई करण्याची धडक मोहीम नोव्हेंबर पासून हाती घेतली आहे. मात्र, सर्वसामान्य कारचालकांवर बिनदिक्कत कारवाई करणाऱ्या पोलिसांनी 'बड्यांकडे' दुर्लक्ष न करता त्यांच्यावरही कारवाई करावी अशी मागणी सर्वसामान्य चालकांकडून होत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ऑगस्ट 2012 मध्ये काळया काचा असणाऱ्या वाहनांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यावेळचे गृहमंत्री यांनीही पोलिस व परिवहन अधिकाऱ्यांना या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याची सूचना केली होती. आताही कोणत्याही दबावाला न जुमानता काळया काचांच्या गाड्यांवर जास्तीत जास्त कारवाई करण्याचे आदेश रायगडच्या डॅशिंग पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी दिले आहेत. मोटार वाहन कायद्याच्या कलम 100 (2) / 117 नुसार काळया काचा असणाऱ्या प्रत्येक वाहनावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. मात्र, केवळ काही रुपये दंड आकारण्याची तरतूद असल्याने त्यामुळे वाहनधारकांना कारवाईची भीती नसून ते दंड भरून निघून जात आहेत. शासनाने याकडे लक्ष देऊन दंड व शिक्षाच्या तरतूद मध्ये बदल करावा. तसेच रायगड पोलिसांनी सदर गाडी



पकडल्यानंतर त्या काळया काचेची संपूर्ण फिल्म अगर इतर पर्याय फाडून काढून टाकावे अशी मागणी सर्वसामान्यांतून जोर धरत आहे.

### राजकीय नेत्यांकडे कानाडोळा नकोच

नियमानुसार मुख्यमंत्री, कॅबिनेट दर्जाचे मंत्री, राज्यमंत्री, झेड आणि वाय सिक्युरिटी असलेल्या व्यक्तींच्या वाहनांवर काळया काचा लावण्याची परवानगी आहे. मात्र खासदार, आमदार, महापौर, नगरसेवक व शासकीय अधिकाऱ्यांना अशी परवानगी नाही. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त, पोलिस आयुक्त, पोलिस व शासकीय वाहनांच्या काचेवर काळी फिल्म लावायची असल्यास न्यायालयाच्या सूचनेनुसार स्थापन करण्यात आलेल्या विशेष समितीची परवानगी घ्यावी लागते. परंतु या समितीकडून परवानगी न घेता सर्रास काचांवर फिल्म चढवल्या जात आहेत. विशेष म्हणजे राजकीय व्यक्ती किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाईच होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. त्यामुळे या बड्या धेंडाकडे कारवाई दरम्यान कानाडोळा नको अशीही मागणी जोर धरत आहे

### रस्त्यावर चार प्रकारच्या फिल्म

खाजगी कार, स्कूल बस, कंपनीच्या कार , कंपनीच्या बसेस, खासगी वाहने, काळी-पिवळी, शासकीय वाहने, पोलिसांच्या गाड्या अशा सर्वच वाहनांच्या काचांवर काळी फिल्म चढवण्यात आली आहे. जिल्ह्यात चार प्रकारच्या फिल्म उपलब्ध आहेत. त्यात प्रामुख्याने 50 आणि 70 टक्के अल्ट्राव्हॉयोलेट रेंजपासून सुरक्षा करणाऱ्या या फिल्म आहेत. फिकट आणि गडद अशा विविध प्रकारात या फिल्म मोडतात. फिल्म लावण्यासाठी 5 ते 25 हजार रुपयांपर्यंत खर्च येतो. मोठ्या रेडियम सेंटरमध्ये व काचांच्या दुकानांमध्ये गाड्यांना फिल्म लावून मिळतात त्यांना सुद्धा नियम पाळण्याचे आदेश दिले पाहिजेत.

### काळया काचांच्या गाड्यांमधून 'रेकी

अनेक गुन्हेगार गुन्हा करताना काळया काचांची गाडी वापरताना निदर्शनास आले आहे. काळया काचांच्या गाडीमध्ये तासनतास बसून बंद असलेले बंगळे, बिल्डिंग, कुलूप असलेला घरांची रेकी करण्यास वापर केला जात आहे. सदर गाडीच्या काचा काळया असल्याने बाजूने जाणाऱ्या नागरिकांचे लक्ष लागत नाही.

### कारवाईला सुरुवात

दरम्यान रायगडच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी ऑक्टोबर महिन्यात गुन्हेगारी मुक्त गाव, आपली जबाबदारी आपला अभिमान या ऑनलाईन मार्गदर्शन सत्रात उपस्थित केलेल्या काळया काचांच्या गाड्यांवरील प्रश्नाला उत्तर देताना, येत्या नोव्हेंबर महिन्यापासून धडक कारवाई करण्यात येणार असल्याचे एसपी दलाल यांनी सांगितले.

# घोडबंदर रस्ता जानेवारी २०२६ मध्ये वाहतूक कोंडीमुक्त होणार

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे प्रतिपादन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : गायमुख घाटाचे पुनर्पुष्ठीकरण, घोडबंदर सेवा रस्ता जोडणी, अमृत जलवाहिनी टाकणे आणि महावितरणच्या वाहिन्यांचे स्थलांतरण ही सर्व कामे पूर्ण होऊन नवीन वर्षात जानेवारी २०२६मध्ये घोडबंदर रस्ता पूर्णपणे वाहतूक कोंडीमुक्त होईल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी केले.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांबाबत आढावा बैठक सोमवारी आयोजित करण्यात आली होती. ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. अरविंद पेंडसे सभागृहात झालेल्या या बैठकीस, महापालिका आयुक्त सौरभ राव, एमएमआरडीएचे सह महानगर आयुक्त आस्तिक कुमार पाण्डेय, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, पोलीस उपायुक्त (वाहतुक) पंकज शिरसाट, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांच्यासह महापालिका, एमएमआरडीए, मेट्रो, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, म्हाडा आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. जस्टिस फॉर घोडबंदर रोड यांचे



प्रतिनिधीही या बैठकीत सहभागी झाले होते.

घोडबंदर रोडवरील विविध समस्यांबाबत जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी या बैठकीत सादरीकरण केले. त्याचा आढावा घेतल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी एमएमआरडीए, महापालिका, मेट्रो आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून रस्त्यावरील कामांच्या स्थितीची माहिती घेतली. गायमुख घाटातील ठाणे महापालिका हद्दीतील रस्त्यांच्या पुर्नपुष्ठीकरणाचे काम वाहतूक पोलिसांशी समन्वय साधून केले जाणार आहे. त्याचवेळी, जस्टिस फॉर घोडबंदर रोडच्या प्रतिनिधींनी सुचवल्याप्रमाणे घोडबंदर रस्त्यावरील सर्व उड्डाणपुलावरील रस्त्याची डागडुजी, पुर्नपुष्ठीकरण एकाचवेळी हाती घेऊन पूर्ण केले जावे, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

त्याचबरोबर, गायमुख घाटाच्या पुर्नपुष्ठीकरणाचे काम पूर्ण झाल्यावर घोडबंदर रस्ता ठाणे महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ठाणे महानगरपालिकेस दिले.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात सुरू असलेल्या आणि आता अंतिम टप्प्यात असलेल्या विविध विकास कामांचे लोकार्पण नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस तसेच डिसेंबर महिन्याच्या मध्यापर्यंत करण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत, ओवळा-माजिवाडा विधानसभा मतदारसंघातील वर्तकनगर, माजीवाडा, लोढा व समता नगर येथील समाज मंदिरे, नागला बंदर खाडी किनारा सुशोभीकरण व कांदळवन उद्यान, उपवन येथील धर्मवीर आनंद दिघे जिमखाना, तरण तलाव, स्मशानभूमी, विहीरी, हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालन, अप्पासाहेब धर्माधिकारी भवन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, आनंद नगर, कासारवडवली उद्यान, भाईंदर पाडा येथील कान्होजी आंग्रे उद्यान यांचे सुशोभीकरण, आनंदीबाई जोशी हॉस्पिटल, मराठा भवन, महिला हॉस्टेल, सी.डी. देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण इमारत, सुधाकर चव्हाण बहुउद्देशीय इमारत, शिवाई नगर, नाले बांधणीची कामे, जॉगिंग ट्रॅक, कासारवडवली येथील मार्केट, राम मंदीर तलाव सुशोभीकरण, लता मंगेशकर संगीत विद्यालय, वर्तकनगर, आनंदनगर स्पोर्टस कॉम्प्लेक्स व फुटबॉल टर्फ, लोकशाहीर आण्णा भाऊ साठे वाचनालय, कासारवडवली आदी प्रकल्पांचा आढावा परिवहन मंत्री यांनी घेतला.

# अत्यंत अवघड व कठिण तैलबैला किल्ला साहसी गिर्यारोहकांनी केला सर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : अत्यंत अवघड व कठिण श्रेणीत गणला जाणारा तैलबैला किल्ला कल्याण येथील सुप्रसिद्ध गिर्यारोहक भूषण पवार यांनी यशस्वीपणे सर केला आहे.

या किल्ल्याची समुद्र सपाटीपासुन उंची तब्बल 3 हजार 332 फुट इतकी आहे. 250 फूट प्रस्तर भिंतीवर प्रस्तरारोहण गिर्यारोहक भूषण पवार यांनी केले. हा किल्ला पुणे जिल्ह्यात येत असला तरी सुधागड तालुक्याच्या सीमेवर आणि सुधागड किल्ल्याच्या अगदी समोर आहे.

कल्याण येथे राहत आलेले प्रसिद्ध गिर्यारोहक व प्रस्तरारोहक भूषण पवार आणि हिम ऑर डील संघाचे



चेतन शिंदे यांनी या मोहिमेचे आयोजन व नेतृत्व केले होते. गिर्यारोहणाची आवड असलेल्या आणि कल्याण गिर्यारोहक संघाचे अध्यक्ष असलेल्या भूषण पवार ह्यांनी गिर्यारोहणाचे तंत्रशुध्द प्रशिक्षण घेऊन आपली आवड जोपासत आजवर अनेक सुळके व गड आकिल्ले सर केले आहेत. या डोंगराच्या माथ्यावर जाण्यासाठी गरजेचे सामान व गिर्यारोहणाच्या तंत्राची माहिती असणे आवश्यक आहे.अली,श्वेताली गुल्हाने,सिमरन अगरवाल यांनी या मोहिमेत सहभाग घेतला होता.

# जान्हवी कोल्हे हिच्या विवाहानिमित्त विविध कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**नागपूर** : नागपूर जिल्ह्यातील दावसा गावातील 'जन गण मन' कॉन्व्हेंट शाळेच्या प्रांगणात, संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार एम. कोल्हे आणि सचिव डॉ. प्रेरणा राजकुमार कोल्हे यांची कन्या जाह्नवी हिच्या विवाहानिमित्त, दिनांक ३१ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रमांचा उत्सवमय सोहळा पार पडला. या दरम्यान शाळेचा वार्षिक सांस्कृतिक सोहळा, 'जे. एम. एफ. ग्रामज्योत पुरस्कार' वितरण, आरोग्य शिबिर, आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर यांसारखे अनेक उपक्रम यशस्वीरीत्या पार पडले.

ग्रामीण जनतेसाठी हा आनंदाचा आणि अभिमानाचा सोहळा ठरला. १ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत शाळेतील विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन आणि सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे, सचिव डॉ. प्रेरणा कोल्हे, मुख्याध्यापक श्री. भूपेंद्र भजन, व्यवस्थापक श्री. महेश कळंबे, श्री. युवराज कोल्हे, श्री. विजय भांगे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि स्वागत गीताने झाली.

२ डिसेंबर रोजी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया देखील करण्यात येणार आहे.



२ नोव्हेंबर रोजी सकाळी आरोग्य शिबिर आणि संध्याकाळी जाह्नवी आणि रोहित यांच्या साखरपुड्याचा, संगीत आणि हळदीचा कार्यक्रम दिमाखात साजरा झाला. मुंबईहून आलेल्या कलाकारांमध्ये चिन्मयी साळवी (वागळे की दुनिया फेम), आयुष्य संजीव, पियुष पांडे, बलजीत पांडे, आदित्य काळे, सिद्धार्थ अखाडे, आणि सिधांत खाडे आदींचा सहभाग विशेष ठरला.

३ नोव्हेंबर रोजी सर्वांच्या प्रतीक्षेचा क्षण उजाडला. मुंबई स्थित जाह्नवी कोल्हे आणि रोहित राजगुरू यांचा विवाह सोहळा भव्य थाटात संपन्न झाला. सर्वांचे लक्ष वेधणारा क्षण म्हणजे डॉ. राजकुमार कोल्हे यांनी स्वतः लिहिलेला मंगलाष्टक, ज्याला रोहित राजगुरू यांनी संगीतबद्ध केले. या मंगलाष्टकाच्या सुरात संपूर्ण सभागृह क्षणभर स्तब्ध झाले आणि अनेकांच्या डोळयांत अश्रू दाटले.

### "ईश्वराच्या दैव हाती, तोच जुळवितो नातीगोती.."

वराची मिरवणूक बैलजोड गाडीतून काढण्यात आली, आणि डॉ. प्रेरणा कोल्हे यांनी पाच सुवासिनींसह औक्षण आणि पदप्रक्षालन करून स्वागत केले. सुमारे ३,००० हून अधिक लोक आणि ५० गावांचे प्रतिनिधी या सोहळयाचे साक्षीदार ठरले. वधू-वराने एकमेकांना हार घालून पवित्र बंधनात अडकले. आई-वडील म्हणून डॉ. कोल्हे दांपत्यांनी भावनिक क्षणी आपल्या लाडक्या लेकीचा कन्यादानाचा संस्कार पूर्ण केला. भारतीय परंपरेनुसार परदेशी पाहुण्यांनी भारतीय पोशाख परिधान करून आपल्या संस्कृतीबद्दल आदर व्यक्त केला. तीन दिवसांच्या या सोहळयात संपूर्ण दावसा गाव रोषणाईने उजळून निघाले.

शेवटी, वधूच्या पाठवणीचा क्षण सर्वांच्या डोळयांत पाणी आणणारा ठरला. आई डॉ. प्रेरणा कोल्हे म्हणाल्या, “सोनपावलांनी आमच्या आयुष्यात आलेली आमची जाह्नवी म्हणजे साक्षात लक्ष्मीच आहे. आता हीच लक्ष्मी सासरी जाऊन ते घर मंगलमय करणार यात शंकाच नाही.” वडील डॉ. राजकुमार कोल्हे यांनीही निशब्दपणे लेकीला आलिंगन देऊन भावूक निरोप दिला. नवरदेव श्री. रोहित राजगुरू यांनी हातात हात घेऊन आयुष्यभर विश्वास आणि प्रेम टिकवण्याचे वचन दिले.

### "दाटून कंठ येतो, ओठात येई गाणे, जा आपुल्या घरी जा, लाडके सुखाने..."

या गीताच्या सुरात कोल्हे परिवाराने आपल्या लेकीला सासरी पाठवले. दुसऱ्या दिवशी हळद उतरविण्याचा कार्यक्रम आणि विविध खेळांचा आनंदोत्सव साजरा झाला, ज्यात सर्वांनी मनसोक्त आनंद लुटला.

# ठाण्यात मराठी राज्य नाट्य स्पर्धा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : महाराष्ट्राच्या नाट्यचळवळीत ठाण्याचे स्थान नेहमीच अग्रभागी राहिले आहे. याच ठाणे नगरीत यंदाही तितक्याच उत्साहात आणि वैभवात ६४ वी हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी रंगणार असून, १० नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत डॉ. समृद्ध काशीनाथ घाणेकर मिनी नाट्यगृह येथे २३ संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. ही स्पर्धा होणार आहे. ज्येष्ठ रंगकर्मी, साहित्यिक आणि कलाकार उपस्थितीत उद्घाटन सोहळा १० नोव्हेंबरला सायंकाळी ७ वाजता पार पडणार आहे. स्पर्धेची सुरुवात ॲमॅच्युअर थिएटर, नागोठणे सादर करणार असलेल्या 'ईश्वरसाक्ष' या नाटकाने होईल. यंदा ठाणे, रायगड आणि पालघर येथील एकूण २३ संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत.




**मेष**
भावा-बहिणींसोबत कोणत्याही मुद्द्यावरून वाद झाला असेल तर तोही सोडवला जाईल. कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**वृषभ**
तुमच्या वागण्यातून लोकांमध्ये समन्वय राखाल. जवळच्या मित्राचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल.कुटुंबासोबत घरी चित्रपट पाहण्याचा बेत करू.

**मिथुन**
मुलांशी काही वाद होण्याची शक्यता आहे, त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा.ऑफिसमध्ये वरिष्ठांचे सहकार्य मिळेल आणि बिघडलेली कामेही पूर्ण होतील.

**कर्क**
लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील. आजचा काळ अनुकूल आहे, परंतु तुमच्या मेहनतीचे चांगले फळ मिळण्यासाठी तुम्हाला कृतीशील राहावे लागेल.

**सिंह**
सरकारी नोकरी करणाऱ्यांना अतिरिक्त जबाबदारी मिळू शकते. अधिकाऱ्यांचाही दबाव असेल.तुम्ही एखाद्या कार्यक्रमात जाण्याचा विचार करू शकता.

**कन्या**
आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल. तुम्ही काही विशेष कामासाठी प्रयत्न करत असाल तर तुम्हाला यश मिळू शकते. दिवस चांगला असेल.

**तूळ**
काही नवीन कल्पनांवरही काम कराल.मुलांकडून काही विशेष आनंदाची बातमी मिळेल, घरातील सर्वजण आनंदी होतील.दिनचर्येत बदल होईल.

**वृश्चिक**
मालमत्ता खरेदी-विक्रीचे नियोजन केले असेल तर ते पूर्ण होऊ शकते. आज कुटुंबात सुसंवाद राहील. तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.

**धनु**
कुटुंबात सुरू असलेली भांडणे बाहेरील कोणाच्याही लक्षात येऊ देऊ नका. वडिलांचा आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहील.कामाच्या क्षमतेत मोठा बदल होईल.

**मकर**
तुम्हाला बालपणीचा एखादा जुना मित्र भेटेल, ज्याला भेटून तुम्हाला आनंद होईल.काही मोठे आणि वेगळे काम करण्याचा विचार करू शकता.

**कुंभ**
जोखीम घेण्यापासून मागे हटणार नाही. असे केल्याने तुम्हाला फायदा देखील होऊ शकतो. तुमचे मत कुटुंबासमोर मांडण्याची पूर्ण संधी मिळेल.

**मीन**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. तुमचा सन्मान होईल. मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५-२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅगझिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in



नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# युनियन क्रिकेट अकॅडमीचा सलग तिसरा शताब्दी करंडक विजय




**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : स्पोर्टिंग क्रिकेट क्लब, ठाणे यांच्या वतीने आयोजित १४ वी शताब्दी निवड चाचणी स्पर्धा सेंट्रल मैदानावर अत्यंत रोमांचक वातावरणात पार पडली. अंतिम सामन्यात कल्याणच्या युनियन क्रिकेट अकॅडमीने युनायटेड क्रिकेट क्लब असोसिएशनवर पहिल्या डावाच्या आघाडीवर आधारित विजय मिळवत सलग तिसऱ्यांदा करंडकावर आपले नाव कोरले.

सामन्याची सुरुवात युनियन क्रिकेट अकॅडमीने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेत केली. युनायटेड क्रिकेट क्लब असोसिएशनने पहिल्यांदा फलंदाजी करत 225 धावा केल्या. अथर्व गवाडे (52) आणि हिर्धान गांभीर (41) यांनी उल्लेखनीय खेळी केल्या. युनियनच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत प्रतिस्पर्ध्यांना दडपणात ठेवले — कुंज पटेल यांनी 23 षटकांत 9 मेडन देत 36 धावांत 4 बळी, तर प्रशांत अल्लू यांनी 23.2 षटकांत 47 धावांत 3 बळी घेत चमकदार गोलंदाजी केली. उत्तरात युनियन क्रिकेट अकॅडमीचा डाव एक टप्प्यावर 41 धावांत 3 बाद अशा कठीण परिस्थितीत सापडला होता. मात्र सनमित कोठमिरे आणि सिद्धांत सिंग या जोडीने जबरदस्त संयम आणि शिस्तबद्ध फलंदाजी करत डाव सावरला. दोघांनी मिळून 150 धावांची भक्कम भागीदारी उभारली.

सनमित कोठमिरे यांनी अप्रतिम फलंदाजी करत नाबाद 213 धावा ठोकल्या — हे त्यांच्या या स्पर्धेतील दुसरे द्विशतक ठरले. सिद्धांत सिंग यांनी देखील तितक्याच आत्मविश्वासाने 77 धावांची महत्वाची खेळी केली. युनियन क्रिकेट अकॅडमीने अखेरीस 5 बाद 428 धावा करत पहिल्या डावाची आघाडी घेत विजय निश्चित केला. या उल्लेखनीय विजयामागे संघाचे प्रशिक्षक कोच किशन पांडे यांचे सक्षम मार्गदर्शन आणि संघाची शिस्तबद्ध खेळशैली हे प्रमुख घटक ठरले. अंतिम सामन्यावेळी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे निवडकर्ते तसेच अनेक क्रीडाप्रेमी मैदानावर उपस्थित राहून या रोमांचक लढतीचा साक्षीदार झाले. सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावत युनियन क्रिकेट अकॅडमीने पुन्हा एकदा ठाण्यातील आपले वर्चस्व सिद्ध केले.

# पुरातन वास्तूंचे वैभव नागरिकांपुढे आणा

**- चित्रकार सुहास बहुलकर**



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : आतापर्यंत ज्या भग्न मूर्ती आढळल्या, त्यामध्ये शिल्पकारांची प्रतिमा जाणवते आणि असे सांभाळले जाणे या भावनेतून पुढच्या काळामध्ये संग्रहालय तयार झाले. संग्रहालयातून अशा गोष्टी जतन झाल्या. ठाणे आणि परिसरामध्ये अशा ठिकाणी असलेले पुरातन वास्तूंचे वैभव नागरिकांपुढे आणणे हे सरकारचे काम आहे, असे मत ज्येष्ठ चित्रकार आणि कला समीक्षक सुहास बहुलकर यांनी व्यक्त केले.

ऑटो रोथफेल्ड लिखित द वूमन ऑफ इंडिया या १९२० मध्ये प्रकाशित झालेल्या पुस्तकातील ज्येष्ठ चित्रकार एम. व्ही. धुरंधर यांनी काढलेल्या तत्कालीन भारतातील विविध प्रांत, व्यवसाय, स्त्रियांच्या वेशभूषांच्या चित्रांचे प्रदर्शन प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे येथे भरविण्यात आले आहे. रविवारी या चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन बहुलकर यांच्या हस्ते झाले.

**२३ व्या वर्षी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सला प्रवेश**

ठाण्यातील होऊन गेलेल्या श्रेष्ठ चित्रकारांच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन भरविण्यात यावे, तसेच त्यांच्या प्रतिकृतींचा संग्रह करून एक संग्रहालय याच शहरात कसे होईल याचा विचार व्हावा, अशी सूचना बहुलकर यांनी केली.बहुलकर म्हणाले की, ऑटो रोथफेल्ड या ब्रिटिश अधिकाऱ्याने अनेक पुस्तके लिहिताना त्यामध्ये चित्रांचा समावेश केला आहे. त्याने धुरंदर यांना निवडून त्यांच्याकडून चित्रे काढून घेतली. धुरंदर हे विलक्षण प्रतिभेचे चित्रकार होते. त्यांना मानवी शरीराचा, भारतीय संस्कृतीचा अभ्यास होता. तो त्यांच्या चित्रातून दिसून येतो. रवी वर्मा यांच्यानंतर सगळ्यात गाजलेले नाव म्हणजे धुरंदर. त्या काळात चित्रकलेला इतकी प्रतिष्ठा नव्हती, परंतु धुरंदर यांना चित्रकलेची आवड इतकी होती, की त्यांनी वयाच्या २३ व्या वर्षी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सला प्रवेश घेतला.

त्यावेळी धुरंदर यांच्यावर टीका व्हायची, काही हजारांमध्ये त्यांची चित्रे विकली जायची. आता मात्र रवी वर्मा यांच्या प्रमाणेच त्यांचे नाव घेतले जाते. त्यांची चित्रे काही कोटींमध्ये विकली जातात. हा काळाचा महिमा आहे. यावेळी डॉ. विजय बेडेकर, डॉ. महेश बेडेकर व इतर दिग्गज चित्रकार उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी शहापूर यांचे कार्यालय**

दुरध्वनी क्र. 02527-272068 फॅक्स क्र : 02527-272068 ई-मेल : 135shahapurst@gmail.com

## जाहिर नोटीस

**प्रति,**
**श्री. तानाजी रामचंद्र निचिते**
**रा. काजळविहिर पो, वेहळोली**
**ता. शहापूर जि. ठाणे.......................................अर्जदार**

**विरुध्द**

**निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग,**
**जन्म/मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी**
**नगर पंचायत, शहापूर, ग्रामपंचायत पाषाणे**
**ता. शहापूर जि.ठाणे...................................सामनेवाले**

जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम, 1969 मधील कलम 13 नुसार तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणे:

1. उपरोक्त अर्जदार श्री. तानाजी रामचंद्र निचिते यांची मुलगी कु. मानसी तानाजी निचिते जन्म दिनांक 13/01/2009 रोजी मौने काजळविहिर ता. शहापूर, जि.ठाणे, येथे झालेला आहे. अर्जदाराकडुन काही अपरिहार्य कारणामुळे तसेच अनावधनामुळे सदर नोंद निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, जन्म/मृत्यु विवाह नोंदणी अधिकारी नगर पंचायत शहापूर व ग्रामपंचायत पाषाणे यांचे दफ्तरी करुन दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहीला होता. अर्जदार यांना कायदेशीर कामाकरीता त्यांच्या स्वतः/मुलगा/मुलगी/बहिण/नात/नातु/भाऊ यांचे दाखल्याची आवश्यकता आहे.
2. उशीरा जन्म / मृत्यु नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसीलदार व कार्यकारी दंडाधिकारी शहापूर यांचेकडून आदेश प्राप्त करुन घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज दि. 11/08/2025 रोजी दाखल केला आहे.
3. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणतीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी. वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना या कार्यालयातर्फे त्यांच्या आजी आजोबा/आई वडील /मुलगा / मुलगी /नातु/भाऊ / बहिण/यांचा जन्म / मृत्यु नोंदणीचा दाखला मिळणेकरीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे 7/11/2025 रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**शहापूर करीता**

जा.क्र.महसूल/एमएजी/मृत्यू नोंद सुनावणी/एस आर- /2025
दिनांक : 31/10/2025

# दिव्यांग क्षेत्रात विना नोंदणी कार्य करणाऱ्या संस्थांवर कारवाई

**— समाजकल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : ठाणे जिल्ह्यासह मुंबई विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये दिव्यांग क्षेत्रात कार्यरत अनेक संस्था शासनाकडे नोंदणी न करता कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर दिव्यांग कल्याण विभागाने अशा संस्थांवर कायद्यानुसार कडक कारवाई करण्याचा इशारा दिला आहे.

ठाणे जिल्ह्यामध्ये कार्यरत दिव्यांग संस्थांनी दि. ३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य असून सर्व दिव्यांग संस्थांनी नोंदणी पुर्ण करून घ्यावे, असे आवाहन समाजकल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे यांनी केले आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार (Rights of Persons with Disabilities Act, 2016) कलम ५१ आणि ५२ अंतर्गत, दिव्यांग क्षेत्रात कार्य करावयाच्या सर्व संस्थांनी शासनाकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे.राज्य शासनाने दिव्यांग कल्याण आयुक्त यांना या अधिनियमांतर्गत सक्षम अधिकारी म्हणून घोषित केले आहे. त्यांच्या मार्फतच संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र प्रदान केले जाते.

या नोंदणीशिवाय कार्यरत राहणे हे कायद्याचे उल्लंघन ठरत असल्याने, कलम ९१ नुसार अशा संस्थांवर दंडात्मक कारवाई होऊ शकते.ठाणे जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे यांनी सांगितले की, "ठाणे जिल्ह्यात दिव्यांगांच्या पुनर्वसन, शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनी आपली नोंदणी पूर्ण करावी. विना नोंदणी कार्यरत राहणे हा गंभीर गैरप्रकार आहे. त्यामुळे संबंधित संस्थांनी ३० नोव्हेंबर, २०२५ पूर्वीच आपले प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयात सादर करावेत, अन्यथा कारवाई टाळता येणार नाही."

नोंदणीसाठी संस्थांनी संबंधित जिल्ह्यातील दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. प्रस्तावासोबत संस्थेची नोंदणी कागदपत्रे, कार्याचे तपशील, लाभार्थ्यांची माहिती आणि शासकीय नियमांनुसार आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

विना नोंदणी कार्यरत संस्थांवर "दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६" मधील कलम ९१ अंतर्गत कायदेशीर कारवाई केली जाणार असून अशा संस्थांना शासन मान्यता, निधी किंवा कोणताही लाभ दिला जाणार नाही.

# अंबरनाथ नगरपरिषद येथील सार्वत्रिक निवडणूकीसाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ** : अंबरनाथ नगरपरिषद येथील स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ संदर्भात आज दिनांक १० नोव्हेंबर २०२५ पर्यंत नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तथापि, आजपर्यंत एकही नामनिर्देशन अर्ज प्राप्त झालेला नाही.

निर्वाचकांना व सर्व संबंधित राजकीय पक्षांना विनंती करण्यात येते की, नामनिर्देशन दाखल करण्याची अंतिम मुदत लक्षात घेऊन नियोजित वेळेत आवश्यक त्या कागदपत्रांसह नामनिर्देशन दाखल करवी निवडणूक प्रक्रियेतील सर्व कामकाज निवडणूक आयोगाने जारी केलेल्या नियम व तरतुदींनुसार पारदर्शक व सुव्यवस्थित पद्धतीने करण्यात येत आहे.

## इनर व्हील क्लब ऑफ कल्याण यांच्या वतीने

# जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : ८ व ९ नोव्हेंबर रोजी इनर व्हील क्लब ऑफ कल्याण यांच्या वतीने ठाणे जिल्हा स्तरावरील दोन दिवसीय बॅडमिंटन स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन माजी नगरसेवक वरुण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी कल्याण भाजप मंडळ अध्यक्ष रितेश फडके, भाजप पदाधिकारी सुधीर वायले,



समृद्ध ताडमारे, भगवान म्हात्रे, ढोलक्या आदी मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेदरम्यान आमदार नरेंद्र पवार यांनीही भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहनपर विचारांनी प्रेरित केले आणि त्यांच्या खेळाविषयीचा उत्साह अधिक वाढविला.

स्पर्धेचे संचालन मुख्य पंच सौरभ प्रधान यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली करण्यात आले. ठाणे जिल्ह्यातील विविध भागांतील नवोदित तसेच अनुभवी खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विजेत्यांना पारितोषिक वितरण इनर व्हील जिल्हा अध्यक्षा सौ. लक्ष्मी सिंह यांच्या हस्ते संपन्न झाले. या स्पर्धेचे यशस्वी आयोजन क्लब अध्यक्षा दिप्ती दिवाडकर, सचिव ॲड. सुशमा पटेल व प्रोजेक्ट चेअरमन ॲड. निता कदम यांच्या नेतृत्वाखाली तसेच इनर व्हील क्लब ऑफ कल्याण च्या सर्व सहकारी सदस्यांच्या अथक प्रयत्नांमुळे शक्य झाले. इनर व्हील क्लब ऑफ कल्याण हे नेहमीच समाजहिताचे आणि प्रेरणादायी प्रकल्प राबविण्यात आघाडीवर राहिले असून, कल्याण शहरात अशा उपयुक्त आणि सामाजिक जाणिवा वाढविणाऱ्या उपक्रमांचे आयोजन सतत करत असते.






# कल्याण ज्वेलर्स असोसिएशन अध्यक्ष राकेश मुथा यांची भाजपात घरवापसी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : जस जशा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुका जवळ येत आहेत तस तसं राजकारण तापत आहे. अनेक दिग्गज माजी नगरसेवक, पदाधिकारी भविष्यातील राजकीय वाटचालीसाठी पक्षांतर करत आहेत. अशातच कल्याण ज्वेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष राकेश मुथा यांनी भारतीय जनता पार्टीमध्ये घरवापसी केली आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्याहस्ते राकेश मुथा यांनी



भाजपामध्ये पक्षप्रवेश केला आहे. यावेळी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, जगन्नाथ पाटील, आमदार सुलभा गायकवाड यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

राकेश मुथा हे भारतीय राष्ट्रीय विद्यार्थी संघाचे 2000 पासून 2010 पर्यंत जिल्हाध्यक्ष होते. 2010 ते 2015 पर्यंत युवक काँग्रेस शहराध्यक्ष, कल्याण डोंबिवली महानगरपालिका शिक्षण मंडळ सदस्य, जिल्हा नियोजन विकास समिती ठाणे जिल्हा सदस्य आदी पदे भूषवली असून ज्वेलर्स असोसिएशन, कल्याणचे अध्यक्ष देखील आहेत. नुकतीच झालेली विधानसभा

**प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हा यांच्याहस्ते राकेश मुथा यांचा भाजपमध्ये पक्ष प्रवेश**

निवडणूक त्यांनी जिजाऊ संस्थेच्या मदतीने अपक्ष लढवली होती. आगामी पालिका निवडणुकीत नागरिकांची जास्तीत जास्त कामे करण्यासाठी भारतीय जनता पार्टीमध्ये पुन्हा घरवापसी केली असून नगरसेवक म्हणून निवडून आल्यानंतर नागरिकांची सेवा आणखी प्रभावीपणे करता येईल अशी प्रतिक्रिया राकेश मुथा यांनी दिली.

# आई डे केअरच्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी मिळवले गोल्ड मेडल



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

पेण : आई डे केअर संस्था संचलित मतिमंद मुलांसाठी निवासी व्यवसाय शिक्षण-प्रशिक्षण केंद्र, रामवाडी पेण या शाळेतील विद्यार्थ्यांनी १६ व्या महाराष्ट्र स्टेट टेबल टेनिस टुर्नामेंट गोरेगाव येथे ८ नोव्हेंबर रोजी झालेल्या स्पर्धेमध्ये १२ ते १५ या वयोगटात भावार्थ म्हात्रे या विद्यार्थ्याला गोल्ड मेडल १६ ते २१ या वयोगटात तन्मय मोकल, धनंजय चंदने, यज्ञेश पाटील या विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल तसेच २१ वर्षापुढील वयोगटात सुयोग पाटील ,प्रणव टिबे,आदित्य रामकृष्णन या विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल मिळाले. आनंदाची बाब म्हणजे शाळेतील ७ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता आणि सर्व विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल मिळवले.यामध्ये शाळेचे क्रीडा प्रशिक्षक व विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक सिद्धांत म्हात्रे व संस्थेचे विश्वस्त यांचे मोलाचे योगदान आहे. सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

# सायकल प्रवासातून फिटनेसचा संदेश



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे:** जिद्द, चिकाटी, ध्येय, सातत्य आणि मेहनत या गुणांच्या जोरावर तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून ठाण्यातील ऋषिकेश आणि श्रद्धा सोनार या दाम्पत्याने इंडिया गेट, दिल्ली ते गेटवे ऑफ इंडिया, मुंबई असा तब्बल १,४१८ किलोमीटरचा सायकल प्रवास पूर्ण करत फिटनेसचा प्रभावी संदेश दिला. अत्यंत प्रतिकूल हवामान, प्रखर ऊन, वादळाचा वारा, अचानक पावसाचे फटके, रस्त्यातील अडथळे, सगळ्या अडचणींवर मात करत हे दाम्पत्य सुरक्षित रविवारी ठाण्यात परतले. कुटुंबीय, मित्रपरिवार आणि सायकलप्रेमी यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले.१,४१८ राइडला सुरुवात केली. किमी प्रवास सोनार दाम्पत्याने केला. श्रद्धा आणि ऋषिकेश सोनार यांनी ३१ ऑक्टोबर रोजी पहाटे ६ वा. दिल्लीतल्या इंडिया गेटवरून त्यांच्या स्व-आधारित कोणतेही सपोर्ट वाहन नव्हते; राहायचे ठिकाण दररोजच्या परिस्थितीनुसार "जागच्या जागी" ठरवत त्यांनी हा प्रवास पूर्ण केला. दोघांनी याआधी अनेक महिन्यांचा कठोर सराव, लांब पल्ल्याचे रायइस आणि मॅरेथॉन फिटनेसद्वारे स्वतःची तयारी केली होती.

# तरुणाच्या जाचाला कंटाळून तरुणीची आत्महत्या

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड** : मुरबाड मधून एक धक्का दायक बातमी समोर येत असून एका 22 वर्षाच्या तरूणीने तरूणाच्या मानसिक त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आपले जीवन संपवले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की सरळगाव नवापाडा येथे मयत वैशाली शांताराम भोईर ही मावशीकडे राहत होती व सरलगाव बाजारपेठेतील डाक्टर



पाल यांच्या हास्पिटल मधे ती नर्सिंगची नोकरी करत होती. याच ठिकाणी तीची स्वप्नील चौधरी या तरूणा बरोबर ओळख झाली. गेले अनेक दिवस या तरूणीला आरोपी स्वप्नील चौधरी हा लग्नासाठी तगादा लावत होता, मानसिक छळ करत होता. तू जर माझ्याशी लग्न केले नाहीस तर मी तुझी बदनामी करेन अशा धमक्या तो देऊ लागला. या प्रकारामुळे ही तरूणी गेले काही दिवस प्रचंड मानसिक तणावात होती. याबद्दल तिने तीची लहान बहीण शुभांगी भोईर हिला कल्पना दिली होती. अखेर दि. 5/11/2025रोजी रात्री मावशीकडे नवापाडा येथे आल्यावर त्याचरात्री मावशी बाहेर गेली असताना पंख्याला ओढणी लटकवून गळफास घेऊन अखेर आपले जीवन संपविले आहे. या घटने बद्दल मुरबाड पोलीस स्टेशन मध्ये तिच्या बहिणीने फिर्याद दाखल केली असून भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत आरोपीवर कलम 108,356,115(2) 351(2) गुन्हा दाखल झाला आहे. सदर तरूणीच्या आत्महत्येस कारणीभूत असेलेल्या आरोपी स्वप्नील चौधरी फरार असून मुरबाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक दादासाहेब एडके यांच्या मार्गदर्शनाखाली साह्हाय्यक पो. नि. महेश बोलके तपास करत असून आरोपीला लवकरात लवकर पकडून शिक्षा व्हावी व मयत वैशालीला न्याय द्यावा अशी मागणी तिचे कुटुंबिय व नातेवाईक करत आहेत.



# भिवंडीत कालभैरव जयंती निमित्त शिवपुराण कथा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी शहरातील ब्राह्मणआळी येथील पोस्टऑफिस मागे असलेल्या कालभैरव मंदिरात श्री कालभैरव जयंती निमित्ताने संगीत श्री शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा शुभ संकल्प महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध तुंगारेश्वर येथील बालयोगी श्री सदानंद महाराज यांच्या हस्ते मोठ्या भक्तीमय वातावरणात संपन्न झाले.या प्रसंगी शहरातील मान्यवर नागरिकांसह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. भिवंडी शहरातील ब्राह्मणआळी येथील जागृत देवस्थान म्हणून ओळखले जाणारे श्री. कालभैरव मंदिराचे पुरातन मंदिर असून या मंदिराचा जीर्णोद्धार २५ वर्षांपूर्वी करण्यात आला. तेंव्हापासून दरवर्षी कालभैरव जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या वर्षी साजरा होत आहे.यंदा जयंती उत्सवा निमित्ताने ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज थोरात संगीत श्री. शिवपुराण कथेचे आयोजन करण्यात आले असून आहे. त्याचा शुभसंकल्प बालयोगी श्री सदानंद महाराज यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यांच्या हस्ते ग्रंथपूजन व दीप पूजन करण्यात आले. या प्रसंगी भिवंडीचे तहसीलदार अभिजीत खोले यांच्यासह मान्यवर नागरिकांसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाणीटंचाई प्रश्नावर उल्हासनगरातील नागरिक आक्रमक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर :** शहर पूर्वेतील वसीटा कॉलनी, शिवनगर, कादंबरी मेघदूत अपार्टमेंट, शिवनगर, मिलिंदनगर, शिवशक्ती कॉलनी, रोमा अपार्टमेंट, महादेवनगर, संतोषनगर, बंजारा कॉलनी आदी परिसरात पाणीटंचाई निर्माण झाली. याबाबत महापालिकेला लेखी देऊनही पाणीटंचाई कायम असल्याने, उद्धवसेनेचे जिल्हाप्रमुख धनंजय बोडारे यांनी आंदोलनाचा इशारा दिला. पाणीटंचाई सोडविण्यासाठी महापालिका पाणीपुरवठा विभाग व आयुक्ताकडे लेखी निवेदन करूनही पाणीपुरवठा नियमित झालेला नाही.

# खर्डी नाक्याजवळील उड्डाणपुलाखालील खड्डे बुजवा

**नागरिकांची मागणी**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर :** मुंबई-नाशिक महामार्गावरील खर्डी नाक्याजवळील उड्डाणपुलाखालील मोठे खड्डे पडल्याने रस्त्यावर वाहनधारकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.या समस्येवर तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी होत आहे. या संदर्भात खर्डीचे उपसरपंच प्रशांत खर्डीकर, ग्रामविकास अधिकारी दीपक साळवे आणि हर्षद कांबळे यांनी नॅशनल हायवे ठेकेदार कंपनीच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन ग्रामपंचायतीच्या वतीने निवेदन देण्यात आले.या ठिकाणी दररोज वाहनांचेही अपघात होत आहेत. तसेच पुलाजवळील गटारीत साचलेल्या घाणीमुळे दुर्गंधी पसरली असून त्यामुळे रोगराई पसरायची भीती निर्माण झाली आहे.

# ठाणे जिल्ह्यातील ११५ शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार'

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** भाजप शिक्षक आघाडी कोकण विभाग आयोजित 'वसंतस्मृती आदर्श शिक्षण संस्थाचालक, शिक्षक, शिक्षकेतर पुरस्कार' सोहळा रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळयात ठाण्यासह रायगड, रत्नागिरी, पालघर, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुमारे ११५ शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' रविवारी प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमात माजी खा. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते वसंतस्मृती आदर्श संस्थाचालक पुरस्कार पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ, भिवंडीचे विश्वस्त व कोकणातील पाच जिल्ह्यातील १० जणांना आदर्श संस्थाचालक पुरस्काराने सन्मानित केले.सरचिटणीस ॲड. रोहित विजय जाधव यांना प्रदान करण्यात आला. पुरस्कार वितरणावेळी सेवानिवृत्त शिक्षक आर. एन. पिंजारी उपस्थित होते. या कार्यक्रमात भाजप आ. संजय केळकर, आ. ज्ञानेश्वर म्हात्रे, भिवंडीच्या पद्मश्री संस्थेचे अध्यक्ष विजय जाधव आणि आ. निरंजन डावखरे आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम ठाण्यातील एम. एच. हायस्कूलमध्ये पार पडला. तर, २५ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

# उल्हासनगरच्या उद्यानांची देखभाल बचत गटांच्या हाती

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर :** महापालिका उद्यान देखभालीचे काम आता महिला बचत गटांना देण्याचा निर्णय आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी घेतला. महिला बचत गटांना कामे देण्याची मागणी शहर काँग्रेसने महापालिका आयुक्ताकडे केली होती. त्याचाच एक भाग म्हणून गेल्या पाच वर्षांपासून महिलांना टॅक्स पावती वाटपाचे काम दिले आहे. त्याचा पुढचा टप्पा म्हणून महिला बचत गटांना उद्यान देखभालीचे काम देण्याचा निर्णय महापालिका आयुक्तांनी घेतला. शुक्रवारी नोंदणीकृत बचत गटांना बोलावून उपायुक्त विशाखा मोटघरे, उद्यान विभाग प्रमुख विशाखा सावंत यांनी बैठक घेतली.




# जिंदाल विद्यालयाच्या शिक्षिका संगीता महाजन यांना "वसंत स्मृती" आदर्श शिक्षक पुरस्कार





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** वासिंद येथील जिंदाल विद्यामंदिर या विद्यालयाच्या शिक्षिका संगीता अनिल महाजन यांना नुकताच कोकण विभाग वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार 2025 देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

संगीता महाजन या गेल्या 27 वर्षापासून जिंदाल विद्यामंदिरात मराठी विषयाचे अध्यापन करीत आहेत त्या अतिशय विद्यार्थी प्रिय व पालकप्रिय शिक्षिका म्हणून ओळखल्या जात आहेत. नुकताच एम एच हायस्कूल ठाणे येथे कोकण विभाग वसंत स्मृती हा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला त्यात 7 जिल्ह्यातील 50 तालुक्यातून हा सन्मानाचा पुरस्कार संगीता महाजन यांना अतिशय सन्मान पूर्वक देऊन त्यांनी आजपर्यंत केलेल्या कार्याचे कौतुक करण्यात आले. जिंदाल विद्यालय ही इंग्रजी माध्यमाची शाळा असून हजारो विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत आहेत परंतु संगीता महाजन मॅडम यांनी या इंग्रजी विषयाचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांना अगदी सहज आणि सोप्या भाषेत मराठी या विषयाचे अध्यापन करून मराठी हा विषय किती सोपा आहे हे अगदी विविध उदाहरणांच्या साह्याने विद्यार्थ्यांच्या मनी उतरविला त्यामुळे संगीता मॅडम या अतिशय विद्यार्थी प्रिय बनल्या त्यांना या मिळालेल्या आदर्श शिक्षिका पुरस्काराने या विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

गेल्या 27 वर्षापासून या विद्यालयातील विद्यार्थ्यांना मराठी विषयाच्या माध्यमातून विविध उपक्रमांचे आयोजन करून त्यांनी सखोल मार्गदर्शन केले तसेच त्यांनी आजपर्यंत विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल याकडे सातत्याने लक्ष दिले आहे त्यामुळे त्यांनी अल्पावधीत विद्यार्थी प्रिय व पालक प्रिय शिक्षिका म्हणून नावलौकिक मिळविला आहे त्यांनी आजपर्यंत विद्यार्थ्यांच्या हितासाठी केलेल्या कामांची दखल घेत नुकताच त्यांना कोकण विभाग वसंत स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार 2025 हा अतिशय सन्मानाचा पुरस्कार डॉक्टर विनय सहस्रबुद्धे आमदार संजय केळकर कोकण विभागाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार डॉ. निरंजन डावखरे या मान्यवर पाहुण्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला त्यांना या मिळालेल्या पुरस्कारामुळे वासिंद आणि परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे व त्यांना पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त होत आहेत. यावेळी या पुरस्कार सोहळयासाठी कोकण विभागातील व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक बंधू- भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाण्याच्या मुलींच्या संघाची रोल बॉल हॅट-ट्रिक

## सलग तिसरे राज्य विजेतेपद जिंकले



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** जळगाव जिल्हा रोल बॉल असोसिएशनने ८-९ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते. ठाणे जिल्हा मुलींच्या संघाने महाराष्ट्राच्या क्रीडा इतिहासात आपला वारसा मजबूत केला आहे. प्रतिष्ठित १९ व्या महाराष्ट्र राज्यस्तरीय रोल बॉल ज्युनियर गट क्रीडा स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांचा ऐतिहासिक "हॅट-ट्रिक" विजय राज्याच्या सर्वोत्तम खेळाडूंविरुद्ध निर्दोष कामगिरीनंतर आला, ज्याचा शेवट अंतिम सामन्यात पुण्यावर नाट्यमय विजयात झाला.

ठाणे संघाने प्राथमिक आणि बाद फेरीत कोल्हापूर, नाशिक, धाराशिव, मुंबई शहर आणि मुंबई उपनगरातील आव्हानात्मक संघांना यशस्वीरित्या पराभूत केले आणि एक परिपूर्ण विक्रम कायम ठेवला. याप्रसंगी विजयी संघाला हॉली क्रॉस शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर जेसिंथा, तसेच ठाणे जिल्हा रोल बॉल संघटनेचे सचिव प्रताप पगार यांनी अभिनंदन केले. मुलींच्या संघाला हॉली क्रॉस शाळेचे क्रिडा शिक्षक रविंद्र देसाई आणि अब्राना सेतूरामन यांनी प्रशिक्षण दिले.

# आगरी समाजाची लेक स्वरा ठाकूर बनली चार्टर्ड अकाउंटंट

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** पेण तालुक्यातील वडगाव येथील रहिवाशी असणारी आगरी समाजाची लेक कु. स्वरा सुरेश ठाकूर हिने नुकत्याच जाहीर झालेल्या चार्टर्ड अकाउंटंट (C.A.) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले असून, आगरी समाजासह वडगाव परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.तिच्या या यशाबद्दल तुळजाभवानी भजन मंडळाच्या वतीने शाल पुष्पगुच्छ ट्रॉफी देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष श्री जांभळे गुरुजी,श्री चंद्रकांत गुरुजी,एम. एस .पाटील प्रदीपचंद्र म्हात्रे ,तू. बा. गुरुजी, वैभव ठाकूर,शरद पाटील, सी एम पाटील,नरेश पाटील, सुधाकर थळे आदींनी अभिनंदन केले.







कु.स्वरा ठाकूर ही सुरेश काशिनाथ ठाकूर व सौ.प्रज्ञा सुरेश ठाकूर यांची कन्या असून, अ.धा.पाटील गुरुजी यांची नात आहे.ठाकूर कुटुंबाचे मूळ गाव रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील हाशिवरे हे आहे. हे दांपत्य उच्चशिक्षित असून, विवाहानंतर पेण वडगाव येथे स्थायिक झाले. आपल्या दोन मुलींच्या शिक्षणाला आणि प्रगतीला सर्वाधिक प्राधान्य दिले आहे.

स्वरा ही लहानपणापासूनच शांत, नम्र व अभ्यासू विद्यार्थी म्हणून ओळखली जाते. शालेय जीवनात तो सदैव हुशार विद्यार्थ्यांच्या यादीत अग्रस्थानी राहिली असून, दहावीच्या परीक्षेत कारमेल हायस्कूल पेण येथे ८८.४० टक्के तर पेण प्रायव्हेट हायस्कूल येथे १२वी परीक्षेत ९१.३८टक्के गुण तर बॅचलर ऑफ अकाउंटिंग अँड फायनान्स BAF( एस. के. सोमय्या कॉलेज ऑफ आर्टस सायन्स अँड कॉमर्स) या परीक्षेत ९.७०CGPI मिळवले आहेत.सी एस परीक्षेत ५३.१७ गुण मिळवून यशाचे शिखर गाठले. स्वराने स्वतःच्या आवडीने आणि दृढ निश्चयाने कॉमर्स शाखा निवडून C.A. बनण्याचा निर्णय घेतला. आईवडील यांनी दिलेली साथ आणि शिक्षकांनी दिलेला गुरूमंत्र यामुळे"आपण नक्की C.A. होणार ही मनापासून जिद्द बाळगून हार न मानता, मोठ्या आत्मविश्वासाने व मेहनतीने या क्षेत्रात पाऊल टाकत अभ्यासक्रम पूर्ण केला. सततच्या प्रयत्नांनी C.Aव्हायची इच्छा मनाशी बाळगून. बारावीच्या परीक्षेत ९१.३८ टक्के गुण मिळवत C.A. अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. अभ्यासादरम्यान कोरोना काळातील ऑनलाईन शिक्षणाच्या अडचणींवर मात करत, C.A. सारखी अवघड व कठीण परीक्षा यशस्वीरीत्या पूर्ण केली. सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या C.A. फायनल परीक्षेत् उत्तम गुणांसह यश संपादन केले. या यशानंतर हाशिवरेसह वडगाव येथे आनंदाचे वातावरण पसरले. मुलीच्या यशाचा आनंद व्यक्त करताना नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांकडून स्वरा व त्याच्या पालकांवर् अभिनंदनाचा वर्षाव होत होता.स्वराचे हे यश केवळ ठाकूर कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण पेण तालुका वडगाव व परिसरासाठी प्रेरणादायी ठरत आहे. जिद्द, सातत्य आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर अशक्य ते शक्य करून दाखवणाऱ्या स्वराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वाशिंद परिसरातील विद्युत पुरवठा सुरळीत सुरू ठेवा

## माजी मंत्री कपिल पाटील यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशिंद** - खातिवली परिसरातील विद्युत पुरवठा सुरळीत सुरू ठेवा अशा प्रकारच्या सूचना माजी मंत्री कपिल पाटील यांनी विद्युत मंडळाचे अधिकारी यांना दिल्याने विद्युत ग्राहकांनी समाधान व्यक्त केले आहे.

गेले अनेक दिवस खातिवली व वाशिंद परिसरातील विद्युत पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने व्यापाऱ्यांचेही मोठे नुकसान होत आहे. त्याचबरोबर छोटे-मोठे व्यवसायिक वारंवार खंडित होत असलेल्या विविध पुरवठ्याला कंटाळले आहेत. विद्युत पुरवठा खंडित झाल्यावर अनेक वेळा विद्युत कर्मचाऱ्यांना फोन लावला असता ते फोन उचलत नसल्याने विद्युत पुरवठा का खंडित झाला आहे विद्युत पुरवठा कधी सुरळीत होईल याची माहिती मिळत नसल्याची तक्रार अनेक विद्युत ग्राहकांनी कपिल पाटील यांच्याकडे केली. परिवार हॉटेल जवळ वारंवार केबल मध्ये बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित होत असल्याचे अधिकारी सांगत आहेत. केबल मुळे वारंवार विद्युत पुरवठा खंडित होत असेल तर ती केबल का बदलली जात नाही असाही प्रश्न यावेळी उपस्थित करण्यात आला. या तक्रारीची दखल पाटील यांनी घेऊन त्याच ठिकाणाहून वरिष्ठ अधिकाऱ्यांना व वाशिंद येथील अधिकारी पगारे यांना फोन लावून विद्युत पुरवठा खंडित न होता सुरळीत ठेवण्यासाठी लक्ष द्या अशा सूचना दिल्या.

# ठाणे व नवी मुंबईमध्ये निरंकारी भक्तांचे रक्तदान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** "मानव सेवा हीच सर्वोत्तम भक्ती होय" या संत निरंकारी मिशनच्या शिकवणुकीला अंगीकारून ओवळा, ठाणे आणि सानपाडा, नवी मुंबई येथे एकंदर 230 निरंकारी भक्तांनी रक्तदान केले. संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या वतीने या दोन्ही शिबिरांचे आयोजन रविवारी 9 नोव्हेंबर रोजी करण्यात आले. संत निरंकारी रक्तपेढीने या शिबिरांमध्ये रक्त संकलन केले.



संत निरंकारी सत्संग भवन, ओवळा येथे आयोजित रक्तदान शिबिरामध्ये 156 भक्तांनी रक्तदान केले. उल्लेखनीय आह की या ठिकाणी 200 हून अधिक इच्छुकांनी रक्तदानासाठी नावे नोंदविली होती. या शिबिराचा शुभारंभ माजी क्षेत्रीय संचालक बाबुभाई पांचाळ यांच्या उपस्थितीत ईश्वराच्या नामस्मरणाने करण्यात आला. याप्रसंगी स्थानिक ब्रांच मुखी लालचंद प्रजापती तसेच स्थानिक सेक्टर संयोजक प्रकाश जोशी उपस्थित होते. शिबिरामध्ये माजी नगरसेवक सिद्धार्थ ओवळेकर तसेच भाजपा ठाणे उपाध्यक्ष राम ठाकुर विशेष अतिथि म्हणून उपस्थित होते. मान्यवरांनी संत निरंकारी मिशनच्या मानवतावादी कार्याची स्तुती केली.

संत निरंकारी सत्संग भवन, सानपाड़ा येथे आयोजित रक्तदान शिबिरात 80 नोंदणीकृत रक्तदात्यांपैकी 76 भक्तांनी रक्तदान केले. या शिबिराचा शुभारंभ क्षेत्रीय संचालक अरुण पाटील यांनी ईश्वराकडे प्रार्थना करून केला. याप्रसंगी स्थानिक सेक्टर संयोजक मनोहर सावंत व इतर प्रबंधक तसेच सेवा दल अधिकारी उपस्थित होते. दोन्ही रक्तदान शिबिरांमध्ये स्थानिक सेवा दल युनिट आणि स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेऊन ही शिबिरे यशस्वी केली.




# भूकरमापक पदांसाठी ऑनलाईन परीक्षा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** भूमि अभिलेख विभागातील गट क पदसमूह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता १३ आणि १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक आणि उमेदवारांच्या प्रवेशपत्राची लिंक विभागाच्या https://mahabhumi.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जमाबंदी आयुक्त आणि भूमि अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे यांनी कळविले आहे. भूमि अभिलेख विभागातील उपरोक्त रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता १ ऑक्टोबर २०२५ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार विहीत कालावधीत ऑनलाइन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी १३ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात पुणे आणि अमरावती विभागात परीक्षा होणार असून या विभागात परीक्षा केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ८ वाजता उपस्थित राहावयाचे आहे. तर दुसऱ्या सत्रात नाशिक आणि नागपूर विभागांमध्ये केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी दुपारी १२ वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे. दिनांक १४ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात मुंबई (कोकण) विभागात परीक्षा केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी सकाळी ८ वाजता तर दुसऱ्या सत्रात छत्रपती संभाजीनगर विभागात केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी दुपारी बारा वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024